# प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २५.०२.२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लचलुचपत प्रतीबंधक विभाग, अमरावती घटक, अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १. श्री.सतीश श्रीकृष्ण निमकर, वय ४६ वर्षे, पद – कृषी सहायक, तालुका कृषी आधिकारी कार्यालय चांदुरबाजार ता. चांदुरबाजार जि. अमरावती रा.मु.पो.ब्राम्हणवाडा थडी, ता. चादुरबाजार, जि. अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २५/०२/२०२६ चे १४/२१ ते १४/२७ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | १,०००/–रुपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १,०००/–रुपये |
| ६ | घटनास्थळ | तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे समोर, चादुरबाजार ता. चांदुरबाजार जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** :– यातील तक्रारदार यांनी दिनांक २५/०२/२०२६ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार याच्या वडीलांच्या बॅक खात्यात कृषी विभागाच्या एकात्मीक फलोत्पादन विकास अभियान योजने अंतर्गत अनुदान रक्कम रुपये १७,९५२/– रुपये जमा झाले होते. ही रक्कम आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार याना मिळवुन देण्यात मदत केल्याचा मोबदला म्हणुन आलोसे हे तक्रारदार याना १०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबातची तक्रार तक्रारदार यांनी लाप्रवि अमरावती येथे दिली होती.

सदरच्या तक्रारीवरुन दोन शासकीय पंचासमक्ष दि.२५/०२/२०२६ रोजी नमुद आरोपी लोकसेवक यांची पडताळणी केली असता आलोसे यांनी अनुदानाची रक्कम तक्रारदार यांच्या वडीलांच्या खात्यात जमा केल्याच्या मोबदला म्हणुन पंचासमक्ष १०००/– रुपये लाचेची मगणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवली. वरुन सापळा कारवाई दरम्यान लाचेची रक्कम स्विकारतांना आरोपी लोकसेवक यांना रंगे हात पकडण्यात आले असुन त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच त्यांचेविरुध्द पो.स्टे.चादुरबाजार ता. चांदुरबाजार. जि.अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र, श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, श्री. सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली पो.उपअधि श्री मंगेश मोहोड. पोनि.योगीता ठाकरे, पो. अंमलदार राजेश मेटकर, आशिष जांभोळे, चालक पो.हवा. नाईक पोहवा शेंडे यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, मो.न.९४०४२९९६२६, टोल फ्रि नंबर– १०६४.

(मंगेश मोहोड)
पोलीस उपअधिक्षक,
ला.प्र.वि.अमरावती